International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.2 Nov – Dec 2022

# भारताने आपल्या परराष्ट्र धोरणातील 'पूर्वेकडे पहा धोरणाचे' (Look East Policy) 'पूर्वेकडे कृती करा धोरण' (Act East Policy) असे नामकरण केल्यानंतर भारत आणि आसियान यांच्यातील सबंध वाढविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा.

**डॉ. राजधर जे. टेमकर[1], जाधव हरिदास अर्जुन[2]**
1संशोधन मार्गदर्शक प्राचार्य, दादा पाटील राजळे महाविद्यालय, आदिनाथनागर,
तालुका -पाथर्डी, जिल्हा - अहमदनगर
2संशोधक विध्यार्थी, राज्यशास्त्र विभाग व संशोधन केंद्र, हिंद सेवा मंडळाचे,
पेमराज सारडा महाविध्यालय, अहमदनगर
**Email-** haridasjadhav74@gmail.com
**Corresponding Author- जाधव हरिदास अर्जुन**
**DOI-10.5281/zenodo.7756134**

**गोषवारा**

दक्षिण-पूर्व आशियाई राष्ट्रांची संघटना (ASEAN) ही इंडोनेशिया, सिंगापूर, फिलीपिन्स, मलेशिया, ब्रुनेई, थायलंड, कंबोडिया, लाओ पीडीआर, म्यानमार आणि व्हिएतनाम या देशांची मिळून बनलेली आहे. 1990 च्या दशकाच्या सुरुवातीपासूनच जगातील राजकीय आणि आर्थिक परिस्थितीतील बदल आणि भारताची आर्थिक उदारीकरणाच्या दिशेने वाटचाल याचाच परिणाम म्हणून भारताने ASEAN सोबत मजबूत आणि बहुआयामी संबंध प्रस्थापित करायला सुरुवात केली. याला 'Look East Policy' (पूर्वेकडे पहा धोरण) म्हणून ओळखले जाऊ लागले. हेच धोरण आज एक गतिमान आणि कृतीभिमुख 'Act East Policy' (पूर्वेकडे कृती करा धोरण) मध्ये परिपक्व झालेले दिसून येते. भारताच्या पंतप्रधानांनी 2014 मध्ये 12व्या आसियान भारत शिखर परिषदेत आणि नाय पाय तव येथे आयोजित 9व्या पूर्व आशिया शिखर परिषदेत तशी औपचारिक घोषणा केली.

**शोधनिबंधाचा उद्देश -** 'पूर्वेकडे पहा धोरणाचे' (Look East Policy) 'पूर्वेकडे कृती करा धोरण' (Act East Policy) असे मकरण केल्यानंतर भारत आणि आसियान यांच्यातील सबंध वाढविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.

**गृहीतक -**

'पूर्वेकडे पहा धोरणाचा' (Look East Policy) 'पूर्वेकडे कृती करा धोरण' (Act East Policy) असा बदल करताना भारताला त्यात अनेक धोरणात्मक बदल करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने भारताने योग्य त्या उपाययोजना करायला सुरुवात केलेली आहे.

**संशोधन पद्धत -**

प्रस्तुत संशोधनसाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केलेला असून त्यासाठी प्रकाशित व अप्रकाशित दुय्यम माहितीचा आधार घेतलेला आहे. दुय्यम माहितीसाठी विविध संदर्भ पुस्तके, वेगवेगळी नियतकालिके आणि लेखांचा संधर्भ घेतलेला आहे.

भारतीय परराष्ट्र धोरणाचा एक भाग म्हणून Look East Policy ची निर्मिती करण्यात आली . शितयुद्धोत्तर काळातील Look East Policy हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे एक महत्वाचे पाऊल होते . या धोरणाची निर्मिती तत्कालीन पी. व्ही. नरसिंह राव सरकारने १९९१ मध्ये केली. राजकीय संबंधांचा विकास, आर्थिक एकीकरण व व्यापार वृद्धी, आणि पूर्व आशियाई देशांशी सुरक्षेसंदर्भात सहकार्य वाढविणे हा त्यामागचा प्रमुख उद्देश होता. आखाती युद्धामुळे व देशांतर्गत राजकीय अस्थिरतेमुळे भारताच्या आर्थिक समस्यांमध्ये अधिकच वाढ होत गेली. यातूनच पुढे निर्माण झालेली हि पोकळी भरून काढण्यासाठी पी. व्ही. नरसिंह राव सरकारला भारतीय परराष्ट्रीय धोरणात बदल करणे क्रमप्राप्त ठरले . आणि त्यातून Look East Policy सारख्या धोरणाची आखणी करण्यात आली . पी. व्ही. नरसिंह राव सरकारने भिडस्तपणे दक्षिण पूर्व आशियावर आपले लक्ष केंद्रित केले. Look East Policy धोरणाला अडीच दशके उलटून गेली. तेंव्हापासून आतापर्यंत त्याचा

विकास होत आहे . पूर्व आशियाई देश आणि ASEAN चे वाढते महत्व लक्षात घेता भारताने या Look East Policy चे Act East Policy मध्ये रूपांतर करत त्यात काही धोरणात्मक बदल करण्यासाठी पाऊले उचलली आहेत . दक्षिण पूर्व आशियामधील सध्याची भू-राजकीय आणि अर्थ-वाणिज्यिक समीकरणे पाहता या प्रदेशामध्ये भारताला आपले स्थान अधिक बळकट करणे आवश्यक आहे. नोव्हेंबर 2014 मध्ये जाहीर करण्यात आलेले 'अ‍ॅक्ट ईस्ट पॉलिसी' हे "लूक ईस्ट पॉलिसी" चे नवीन रूप आहे. विविध स्तरांवर आशिया-पॅसिफिक प्रदेशाशी आर्थिक, धोरणात्मक आणि सांस्कृतिक संबंधांना प्रोत्साहन देण्यासाठी हा एक राजनैतिक उपक्रम आहे. यामध्ये दक्षिणपूर्व आशियाई देशांसोबत जोडणी (Connectivity), व्यापार, संस्कृती, संरक्षण आणि द्विपक्षीय, प्रादेशिक आणि बहुपक्षीय स्तरांवर संपर्क क्षेत्रात गहन आणि सतत सहभाग समाविष्ट आहे.

**पूर्वेकडे पहा धोरण आणि पूर्वेकडे कृती करा धोरणातील फरक -**

**पूर्वेकडे पहा धोरण**

1) दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्रांची संघटना (ASEAN) देश + आर्थिक एकात्मता यावर लक्ष केंद्रित पूर्वेचे धोरण.
2) भारत 1996 मध्ये ASEAN चा संवाद भागीदार आणि 2002 मध्ये शिखर पातळीवरील भागीदार बनला.
3) 2012 मध्ये हे नाते स्ट्रॅटेजिक पार्टनरशिपमध्ये श्रेणीबद्ध झाले.
4) 1992 मध्ये जेव्हा भारताने पूर्वेकडे पहा धोरण सुरू केले, तेव्हा भारताचा ASEAN सोबतचा व्यापार USD 2 बिलियन होता. ASEAN सह 2010 मध्ये मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी केल्यानंतर, व्यापार USD 72 अब्ज (2017-18) पर्यंत वाढला आहे.
5) पूर्व आशिया समिट (EAS), ASEAN रीजनल फोरम (ARF) इत्यादीसारख्या अनेक प्रादेशिक मंचांमध्येही भारत सक्रिय सहभागी आहे.

**पूर्वेकडे कृती करा धोरण -**

1) पूर्वेकडे कृती करा धोरण आसियान देश + आर्थिक एकात्मता + पूर्व आशियाई देश + सुरक्षा सहकार्य यावर केंद्रित आहे.
2) भारताच्या पंतप्रधानांनी ऍक्ट ईस्ट पॉलिसीच्या 4C वर प्रकाश टाकला.
3) Culture (संस्कृती), Commerce (वाणिज्य), Connectivity (कनेक्टिव्हिटी) आणि Capacity Building (क्षमता बांधणी).
4) सुरक्षा हा भारताच्या ऍक्ट ईस्ट पॉलिसीचा एक महत्त्वाचा पाया आहे.
5) दक्षिण चीन समुद्र आणि हिंदी महासागरात चीनच्या वाढत्या प्रभावाच्या दृष्टीने भारतासाठी जलवाहतुकीचे स्वातंत्र्य सुरक्षित करणे आणि हिंदी महासागरात भारताची स्वतःची ठोस भूमिका हे ऍक्ट ईस्ट पॉलिसीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.
6) या अनुषंगाने, भारत क्वाड नावाच्या इंडो-पॅसिफिक आणि अनौपचारिक गटात सहभागी झालेला आहे.

**कनेक्टिव्हिटी वाढविण्यासाठी पुढाकार:**

1) भारत आणि बांगलादेश दरम्यान आगरतळा-अखौरा रेल्वे लिंक.
2) बांगलादेशमार्गे इंटरमॉडल ट्रान्सपोर्ट लिंकेज आणि अंतर्देशीय जलमार्ग.
3) कलादान मल्टीमॉडल ट्रान्झिट ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट आणि ईशान्येला म्यानमार आणि थायलंडशी जोडणारा त्रिपक्षीय महामार्ग प्रकल्प.
4) भारत-जपान ऍक्ट ईस्ट फोरम अंतर्गत, रस्ते आणि पूल आणि जलविद्युत प्रकल्पांचे आधुनिकीकरण यासारखे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.
5) भारत-जपान ऍक्ट ईस्ट फोरम 2017 मध्ये स्थापन करण्यात आला होता ज्याचा उद्देश भारताच्या "ऍक्ट ईस्ट पॉलिसी" आणि जपानच्या "फ्री अँड ओपन इंडो-पॅसिफिक स्ट्रॅटेजी" च्या रूब्रिक अंतर्गत भारत-जपान सहकार्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करणे आहे.

**इतर उपक्रम:**

1) साथीच्या आजारादरम्यान आसियान देशांना औषधे/वैद्यकीय पुरवठ्याच्या स्वरूपात मदत दिली जाते.
2) आसियान देशांतील सहभागींसाठी आयआयटीमध्ये 1000 पीएचडी फेलोशिपच्या ऑफरसह शिष्यवृत्ती देण्यात आली आहे.
3) भारत कंबोडिया, लाओस, म्यानमार आणि व्हिएतनाममध्ये शिक्षण, जलस्रोत, आरोग्य इत्यादी क्षेत्रातील तळागाळातील समुदायांना विकास सहाय्य देण्यासाठी क्विक इम्पॅक्ट प्रकल्प राबवत आहे.
4) क्विक इम्पॅक्ट प्रोजेक्ट्स (क्यूआयपी) हे लहान आकाराचे, कमी किमतीचे प्रकल्प आहेत जे कमी

कालावधीत नियोजित आणि अंमलात आणले जातात.

**सारांश -**

पूर्वेकडे पहा धोरणाचा अवलंब करण्यामागे अनेक कारणे होती. १९९० च्या सुरुवातीच्या काळात देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय समीकरणे बदलल्याने भारताला पर्याय शोधण्यास भाग पाडले आणि म्हणून भारताच्या परराष्ट्र धोरणाने वळण घेतले आणि पूर्वेकडे पहा धोरण सुरू केले. पुढे २०१४ साली सत्ताबदल झाल्यानंतर भारतीय पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली भारताने आपल्या परराष्ट्र धोरणातील 'पूर्वेकडे पहा धोरणाचे' (Look East Policy) 'पूर्वेकडे कृती करा धोरण' (Act East Policy) असा बदल करून भारताची भूमिका अधिक सक्रीय केली. दक्षिण पूर्व आशिया सोबत आर्थिक, सांस्कृतिक, धोरणात्मक, संरक्षण सहकार्य विकसित आणि दक्षिणपूर्व आशियातील चीनचा प्रभाव कमी करून आपला प्रभाव वाढविणे हा त्यामागे उद्देश होता. लुक ईस्ट आणि ऍक्ट ईस्ट मधील एक महत्त्वाचा फरक हा आहे की ऍक्ट ईस्ट पॉलिसी अंतर्गत भारत सरकारने पायाभूत सुविधांवर जास्त भर दिला आहे ज्यातून भारत सरकार आपल्या पूर्वेकडील देशांशी सहकार्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहे.

**संदर्भ -**


1. Chandrasekhar, B. (2019, November 4). From Look East to Act East: Flowering of an Asian Renaissance. Retrieved from https://thegeopolitics.com/from-look-east-to-act-east-flowering-ofan-asian-renaissance/
2. Chaturvedi, A., & Sharma, D. H. (2020). INDIA’S FOREIGN POLICY: A TRANSFORMATION FROM ‘LOOK-EAST’ TO ‘ACT-EAST’. Journal of Critical Reviews, 7 (11).
3. Roy, N. (2020). Evaluating India’s Look-East Policy: Challenges And Opportunities Under Upa Rule. Asian Affairs, 51 (3), 642-655.
4. Sajjanhar, A. (2016, May 12). India’s Act East Policy so far and beyond. Retrieved from https://www.gatewayhouse.in/indias-act-east-policy-far-beyond/
5. Thakur, H. K. (2017). India's Foreign Policy Towards China Under the New BJP Regime. Journal of Polity and Society .